भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५१४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १६/०७/२०१७

**१) संगनमत करुन पुलाला लावलेले लोंखडी पाईपची चोरी . :–**

दिनांक १३+१४/०७/२०१७ चे रात्र. दर. यातील आरोपीतांनी संगनमत करुन पुलाला लावलेले लोंखडी पाईप ०७ नग २० फुट लांबीचे किंमती ७,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी सौ. माया विजय वासनिक वय ३५ वर्ष, रा. कोंढी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कांबळे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) अल्पवयीन मुलीवर अत्याचार करुन लग्नास नकार दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १५/०७/२०१७ चे पुर्वी. यातील पिडीत फिर्यादी मुलीचे मागील ३ वर्षा पासुन आरोपी सोबत प्रेम संबध होते त्याग ती अल्पवयीन असल्याचे माहित असुन तु १८ वर्षाची झाली की मी तुझ्या सोबत लग्न करीन अशी बतावनी करुन तिचे वर अत्याचार करुन वारंवार अत्याचार केल्यामुळे ती ०६ महिण्याची गर्भवती राहील्याने व आता लग्न करण्यास नकार दिल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७६(२)(एन) भादंवि. सहकलम ४,५(ल),६ बाल.लै.अपराधा पासुन बालकाचे संरक्षण अधि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. ऊईके पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन विवाहीतेस पैश्यासाठी शारीरीक व मानसिक त्रास दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १५/०७/२०१७ चे पुर्वी. यातील फिर्यादीचे मे २०१६ ला आरोपी क्र. १ सोबत रितीरीवाजाप्रमाणे लग्न झाले होते लग्ना नंतर फिर्यादीस काही दिवस चांगले वागविले परंतु नंतर तु तुझ्या वडीलांकडुन २,००,०००/–रु, स्कुटी गाडी दागीने आण असे म्हणुन फिर्यादीस शारीरीक व मानसीक त्रास दिले व आरोपी क्र. २ ते ५ हे आरोपी क्र. १ ला सदर बाबीकरीता प्रोत्साहीत करीत होते सदरचे प्रकरण महिला तक्रार निवारण कक्ष तिरोडा येथे न निपटल्याने महिला तक्रार निवारणाच्या लेखी अहवाला वरुन व फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३०४(अ),३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**४) महिलेस शिवीगाळ करुन थापडबुक्यांनी व लाथाबुक्यांनी मारहान केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १५/०७/२०१७ चे १७.४० ते १८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीला आरोपी क्र. २ हिने शिवीगाळ करुन टोमणे मारले व आरोपी क्र. १ ने फिर्यादीला तु माझ्या पत्नीला का मारले या कारणा वरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, थापडाने मारहान करुन फिर्यादीचे साळीला ओढुन अश्लिल शिवीगाळ केल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४(ब),३२३,५०६,५०९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यार्त आला. पुढील तपास पोउपनि. आत्राम पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

५) घरात प्रवेश करुन लग्नाला लावलेले पैसे परत दे या कारणावरुन भांडण करुन लोखंडी सान्सी मारुन जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक १५/०७/२०१७ चे १७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही घरी हजर असतांना यातील आरोपी ही घरात प्रवेश करुन मी तुझ्या लग्नाला लावलेले पैसे दे म्हणुन भांडण करुन तिला थापडाने मारुन घरातील लोखंडी सान्सी डोक्यावर मारुन जखमी केल्याने व मुलीला फिर्यादीला जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५२,३२४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

६) अवैध दारु अडयावर धाडी . :—

दिनांक १५/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा व अडयाळ येथे अवैध दारुअडयावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २१ किमती २१००/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक १५/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १७९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०४ तीन सिटर वाहनांवरती १९ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १५६ केसेस करण्यात आलेल्या आहेत

पोलीस उपनिरीक्षक एस.एन. बोरकर
पोलीस नियंत्रण कक्ष अधिकारी
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९५५२५३५८२५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.